# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक १३ ऑगस्ट २००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त</u>**

गुरूवार दिनांक १३/०८/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१.१० वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से.,नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०२. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०३. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०४. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलिंद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.सौ.विजयाताई बनकर
१५. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२५. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२६. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसूद
२७. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२८. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
३०. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
३१. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज

३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३३. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३४. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
३६. स.स.श्री.संजु रिडलॉन
३७. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान मुजीब मिर आलम खान
३९. स.स.श्री.खान निसार मोहम्मद खान
४०. स.स.श्री.खान हाजी शेरखान अ.रहेमान
४१. स.स.सौ.राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
४३. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४५. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४७. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४८. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
४९. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५०. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५१. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५४. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
५७. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५८. स.स.श्री.खुडे विजय किसन
५९. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६०. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
६१. स.स.श्री.दामोधर माधवराव शिंदे
६२. स.स.श्रीमती सरिता अशोक ससाणे
६३. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६४. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७०. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७४. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट

७५. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन
७६. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
७७. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
७८. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०२. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.मुजीब खान :स्वच्छतेवर चर्चा होणे आवश्यक आहे स्वाईन फ्ल्युची साथ आली स्वाईन फ्ल्यु व्यतिरक्त मलेरिया, डेग्यू आजारापासून अनेक लोकांचा मृत्यू झाला असे चित्र आहे. नाले,गटार व इतर मोकळया ठिकाणी घाण पाणी साचवू नये वेळीच कचरा उचलला पाहिजे मोंढा परीसरात पुलाजवळ शाळेची इमारत असून बाजूलाच नाल्याच्या कडेला हॉटेलचे विष्ठान्न टाकले जाते ते उचलले जात नाही यामूळे दुर्गंधी वाढते सर्दी,खोकला,ताप या सारखे आजार होतात बुढीलेन भागात कचरा साचला बातम्या आल्या आजही तो कचरा तसाच पडून आहे डेग्यू मूळे या भागात एक व्यक्तीचा मृत्यू झाला माझे वार्डातही दोन लोक आजारी आहे वार्डातील स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासनाला पत्र दिले आजही कचरा उचलला नाही आरोग्य चांगले राहील यासाठी स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज आहे पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाल्यांची साफसफाई होत होती. ती झाली नाही रोषण गेट ते चंपा मंस्जीद पर्यतच्या नाल्यात ५-६ फुट गाळ साचला ३ वेळेस पत्र दिले अदयाप घाण काढली नाही प्रशासनाने साफसफाई मोहिम राबवून जास्तीत जास्त स्वच्छता करण्याकडे लक्ष दयावे. यामूळे नागरीकांचे आरोग्य चांगले राहू शकेल.

श्री.सय्यद खुसरो : स.सदस्य श्री.मुजीब आलमशाह यांचे मताशी मी सहमत आहे. इमारत टप्पा क्र.३ च्या मागे नुर कॉलनी ते भाजीमंडई पर्यतच्या नाल्यात गाळ व घाण साचलेली आहे बाजूच्या नागरीकांना डास,मच्छरांपासून त्रास होतो. सभा संपल्यानंतर आपण व प्रशासनाने पाहणी करावी. परीस्थिती समजून येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :देशात व या राज्यातील मुंबई पुणे नाशिक व उस्मानाबाद या ठिकाणी स्वाईन फ्ल्युचे अनेक रूग्ण आढळून आले अनेकांना लागण झाली औरंगाबाद शहरात हा आजार येणार नाही यासाठी स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासनाने नियोजन काय, कोणते कर्मचारी व त्यांना कोणत्या सुविधा पुरविल्या कोणते प्रशिक्षण दिले सर्व माहिती देण्यात यावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : देशात स्वाईन फ्लूची साथ आली या शहरात अजून आलेली नाही या बाबतीत दखल घ्यायला पाहिजे स्वच्छेतेकडे लक्ष देण्याची गरज आहे आरोग्य विभागाने या बाबतीत काय उपाययोजना केलेल्या आहेत. नाल्याची साफसफाई होणे आवश्यक आहे. बुढ्ढीलेनमध्ये डेंग्यू या आजाराने एका व्यक्तीचा मृत्यू झाला यास जबाबदार महापालिका आहे संबधीत अधिकारी यांचे वर गुन्हा दाखल करावयास पाहिजे पुणे पर्यंत स्वाईन फ्लूची साथ आलेली आहे या शहरातही येवू शकते त्यासाठी स्वच्छतेचे सर्व अधिकार वार्ड अधिकारी यांना देण्यात यावे. वार्ड कार्यालयास कामाला लावावे.

श्री.विनायक पांडे :स्वच्छता व नाले सफाई कडे लक्ष दयावेच तसेच नाल्यातील सिव्हर लाईनमधून पाणी वाहते पाऊस नसल्यामूळे ते पाणी वाहून जात नाही जागोजागी साचते त्याबाबतीत नियोजन काय तसेच वराहपालन करणारे लोकांनी वेगळया ठिकाणी जागा देणे बाबत निवेदन दिलेले आहे त्या बाबतीत काय नियोजन आहे.

श्री.महेश माळवतकर :पुणे शहर इतर भागात स्वाईन फ्लूची साथ पसरली अनेक शाळा व कॉलेजचे विदयार्थी यांना या रोगाची लागण झाल्याचे दिसून येते.या शहरातील महापालिकेच्या शाळामधील स्वच्छतागृह,पाण्याची व्यवस्था व बाजूचा परीसर स्वच्छ करण्याची आवश्यकता आहे अनेक शाळांची वाईट परीस्थिती असून याकडे लक्ष देण्याची गरज आहे.नाले हे पावसाच्या पाण्यासाठी असतात सिडको भागात नाल्यातून ड्रेनेजचे पाणी वाहते बचत गटाच्या मार्फत स्वच्छतेचे काम होते कर्मचारी व वाहनाची संख्या कमी आहे जे कर्मचारी काम करतात त्यांचे सुरक्षतेची काळजी घेतली जात नाही मागिल आठवडयात एक कर्मचाऱ्यांचा मृत्यु,कर्मचारी वाढवून देण्याची गरज आहे जो कचरा डेपोमध्ये एकत्रित पडतो तो महापालिकेच्या वाहन उचलतात परंतु दिवस भरात आलेला कचरा उचलण्याची व्यवस्था महापालिकेकडे नाही सिडको हडको भागात वेळच्या वेळी कचरा उचलला जात नाही. आजाराची साथ आली व नंतर उपाययोजना करणार असेल तर योग्य ठरणार नाही. जनतेचे हिताकडे लक्ष देणारी ही संस्था असल्यामूळे नागरीकाच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य उपाययोजना, औषधोपचार करण्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सौ.अजरा जबीन खान :शहरात साफसफाई होते कचरा उचलला जातो ज्या ठिकाणी जमा होतो तेथून दुस-या दिवशी उचलला जातो त्या जागेवर मोठी घाण असते दुर्गंधी येते.त्यासाठी नियोजन करावे.बाजूच्या परीसरातील नागरीकांना त्याचा मोठया प्रमाणात त्रास होतो आजार वाढतो तेंव्हा रूग्ण दवाखान्यात येतो अशा वेळी.मेडीसीन वेळेवर उपलब्ध नसते व इतर अनेक अडचणी येतात. गरीब नवाज हॉस्पीटलमध्ये डॉक्टराची संख्या कमी आहे.रांगेत उभे राहून नंबर लावावा लागतो लहान मुलांना त्रास होतो त्यानंतरही उपचाराच्या वेळी औषधी नसल्याचे उत्तर मिळते हे बरोबर नाही.कचरा उचलल्यानंतर त्या जागेवर औषध पाणी वापर करावा त्यामूळे दुर्गंधी व आजाराचा फैलाव होणार नाही.

सौ.लता दलाल : वराहज्वरा संबधी चर्चा होते जेथे बाजारपेठाचा परीसर आहे तेथे डुकरांचा सुळसुळाट आहे. अनेक शाळा जवळपास तेथे आहे. संबधीत अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले होते मान्सूनपूर्व नाला सफाई कचरा घाण काढली गेली नाही बाजूचा कचरा काढला तोही नाल्याच्या बाजूला आजही पडून आहे. मोठया प्रमाणात पाऊस न झाल्यामूळे नॅचरली मोठा प्रवाह झाला नाही त्यामूळे नाले साफ झाले नाही. पाउस नसल्यामूळे आणखी रोगराई पसरण्याची शक्यता आहे. नाल्यातील कचरा गाळ काढून जास्तीत जास्त स्वच्छता ठेवण्यासाठी व स्वाईन फ्लूमुळे आपण शाळेला सुटटी जाहीर केली होती मा.जिल्हाधिकारी यांनी ती कोणत्या अधिकारात रद्य केली माहिती दयावी.

श्री.वसंत नरवडे :स्वाईन फ्यू आजारास वाव मिळू नये यासाठी ४-५ दिवसात स्वच्छतेच्या बाबतीत सुधारणा दिसून येते.तीही अपुरी आहे असे वाटते.कचरा कुंडी व

इतर ठिकाणचा कचरा उचलल्यानंतर खाली ओलावा असतो तेथे BSC पावडर टाकणे आवश्यक आहे ते उपलब्ध नाही अशी माहिती मिळते BSC पावडर व नोव्हान किती उपलब्ध आहे माहिती दयावी.मास्कची टंचाई आहे ५ रू.ऐवजी २० रू.त विक्री होत आहे गरीब नागरीक ते खरेदी करू शकणार नाही नगरसेवक निधीतून प्रत्येकी १० हजार घेवून स्वाईन फ्लू नियत्रंण ठेवण्यासाठी मास्क खरेदी किंवा इतर जो खर्च करावा लागणार त्यासाठी खर्च करावे मास्क हे नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून घ्यावे व वाटप करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :माझे वार्डात जालना रोड ते विमानतळपर्यंत असलेल्या नाल्यात ४५० व्यासाची ड्रेनेज लाईनचे पाणी वाहते काही ठिकाणी पाणी साचले नाल्यात इतर घाण मोठयाप्रमाणात असून डास,मच्छराचा उपद्रव वाढतो, राजीवगांधी नगर भागात डेग्यूच्या आजाराने एका व्यक्तीचा मागे मृत्यू झाला आरोग्य अधिकारी यांनी या नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी केली लाईनची दुरूस्ती व साफसफाई करण्याची शहर अभियंता कार्य. अभियंता ई व फ यांना वारंवार निदर्शनास आणून दिले कार्यवाही होत नाही. त्वरीत काम करण्याचे आदेशीत करावे.

श्री.अनिल जैस्वाल :स्वाईन फ्लूमूळे नागरीकांच्या मनात घबराट निर्माण झाली त्यांना धीर देण्याचे काम महापालिकेने करावे २-२ दिवस कचरा उचलला जात नाही उचलेल्या कचऱ्याच्या जागेवर पावडर टाकून डास मंच्छरवर परीणाम होत नाही चांगल्या प्रतीचे औषधी आहे का शहानिशा करावी. २-३ महिण्यापासून औषध फवारणी होत नाही पाण्याची लाईन नाल्यातून जाते वॉल लिकिजेस असल्याने दुषित पिण्याचे पाणी नागरीकांना दिले जाते त्यापासून अनेक आजार होवू शकतात. नियमीत सफाईचे काम व्हावे कचरा उचलण्यासाठी वाहन संख्या वाढवावी. नियमित कचरा उचलण्यांत यावा.

श्री.प्रशांत देसरडा :स्वाईन फ्ल्युच्या आजारावर नियंत्रण राहण्यासाठी नियोजन करणे व राहिलेले काम पूर्ण करायला पाहिजे होते.मेडीकल,मोठमोठे हॉस्पीटममध्ये मध्ये मास्क उपलब्ध नाही पुणे सारख्या शहरात एक महिण्यापूर्वी स्वाईन फ्यूची साथ आली या शहरातही तो आजार येवू शकतो यासाठी एक महिणा अगोदरच उपाययोजना म्हणून ५-२-२ मध्ये मंजूरी घेवून येथील गरीब नागरीकांना मास्क पुरविण्याचे काम महापालिकेचे होते.शहरात अनेक स्पॉटवर जसे रेल्वेस्टेशन विमानतळ,बसस्टॅण्ड अशा ठिकाणी बाहेरून लोक येतात अशा ठिकाणी पथक नेमून येणाऱ्या लोकांची तपासणी करता येवू शकेल का त्यासाठी कार्यवाही करावी.जुने शहर व सिडको परीसरातही स्वच्छता चांगली होत नाही अनेक हॉटेलचे विष्ठअन्न कचरा कुंडीत टाकले जाते त्यामूळे दुर्गधी सुटते आजार होवू शकतात. तेथील कचरा उचलण्यासाठी टेंडर काढले होते त्याची अमलबजावणी अदयाप झालेली नाही.लहान मुलांना हा आजार लवकर होतो म्हणून आपण शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला होता परंतु मा.जिल्हाधिकारी यांनी मा.आयुक्त मा.महापौर यांना विश्वासात न घेता परस्पर तो निर्णय रद्द केला त्याचा मी धिक्कार करतो.शाळा बंद ठेवणे आवश्यक आहे या बाबत मा.आयुक्त,जिल्हाधिकारी व आपण पुन्हा एकत्रिक बसून निर्णय घ्यावा.

श्रीमती सफिया मोमीन :स्वाईन फ्ल्यूची साथ पसरणार नाही यासाठी स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज आहे शहरात अनेक ठिकाणी घाण कचरा साचलेला असून नाल्याची साफसफाई होत नाही माझे वार्डात दवाखान्या समोर मोईनूल उलूम स्कूलच्या समोरील मैदानात कचरा जमा होतो १५दिवस तसाच पडून असतो.त्यामूळे डासाचे प्रमाणे व दुर्गधी सुटलेली आहे.याकडे लक्ष दयावे तसेच नगरसेवक स्वेच्छानिधीतून गरीब नागरीकांना मास्क उपलब्ध करून दयावे.

श्री.अ.रशिद खान :तत्कालीन विभागीय आयुक्त श्री.कपूर यांनी जो कुणी रस्त्यावर कचरा व घाण करेल त्यांना दंड लावण्याचा निर्णय धेतला होता. स्वच्छता निरीक्षक कर्मचारी त्यावेळी लक्ष देत होते या कर्मचाऱ्यांची संख्या कमी दिसून येते.जशी अधिकारी यांनी बैठक आयोजित केली जाते त्याच प्रमाणे स्वच्छता निरीक्षक यांचे कामच्या बाबतीत ही मा.आयुक्तांनी बैठक घ्यावी. रस्त्यावर जो घाण टाकत असेल त्यांना नोटीस देवून कार्यवाही करावी महापालिका समोर देशी दारूचे दुकान असून लोक समोर संरक्षित भिंतीवर लघवी करतात रस्त्याने महिला व अनेक नागरीक वावरत असतात एकतर दुकान हटवावे नसता या लोकांवर कार्यवाही करावी.माझे वार्डात डेग्यू मूळे एक नागरीकांचा, बुढीलेन मध्ये २५ वर्षाचे इसमाचा मृत्यू झाला नाल्याची सफाई व्यवस्थीत होत नाही कचरा घाण उचलण्याचा ठेका दिला जातो नाल्यातून कचरा बाजूला केला जातो पुन्हा नाल्यातच येतो असे होवू नये याकडे लक्ष देण्याची गरज आहे.हॉटेलवाले नाल्यात कचरा टाकत असेल तर नोटीस देवून नियमाने कार्यवाही करण्याची गरज आहे डोअर टू डोअर कचरा जमा केला तरी लोक कचरा आणून टाकतात त्यांचेवर कार्यवाही करावी तसेच अनेक दवाखन्यात डॉक्टर वेळेवर हजर नसतात रूग्ण येतात डॉक्टर घरी निघून जातात त्यांना जास्त वेळ थांबविण्याचे आदेशीत करावे प्रशासनाने या बाबतीत कार्यवाही करावी.

सौ.रजनी जोशी :एन ११ येथील दवाखान्यात ४ संशयित रूग्ण घाटीमध्ये पाठविण्यात आले, या दवाखान्यात इतर आजाराचे रूग्णाची नेहमीच वर्दळ असते. आपण आपल्या अधिकारात शाळा बंद ठेवल्या मा.जिल्हाधिकारी यांनी स्थगिती दिली घटक चाचणी असल्यामूळे काही शाळा पुन्हा सुरू झाल्या नागरीकाच्यामध्ये यामूळे शाळा चालू की बंद संभ्रम निर्माण झाला असे होवू नये नाल्याची वेळेवर साफसफाई व्हावी. डासाचे प्रमाण वाढले आहे स्वाईन फ्लू शिवाय मलेरिया व इतर आजार होवू शकतात याकडे लक्ष देण्याची गरज आहे. मान्सुनपूर्व डासास प्रतिबंध करावे.

श्री.संजय जोशी एका रूग्णास १० गोळया लागतात २५ गोळयाच आलेल्या आहेत मास्कचे लाईफ हे ८-१० तासच असते मास्क किती व कोठून घेतले माहिती दयावी मार्केटमध्ये ५,७ रू.चे मास्क २०,२२,२५ रू.ने विक्री होत आहे संबधीत विभागाशी चर्चा करून किंमतीवर नियत्रंण आणावे.शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला तो आजार या शहरात आलेला नाही म्हणून मा.जिल्हाधिकारी यांनी शाळा बंदचा निर्णय रद्य केला दुसरीकडे अनेक रूग्णांचे सॅम्पल पुणेला पाठविले असे वाचण्यात येते स्वाईन फ्ल्यूची साथ आल्यानंतर प्रशासन कामाला लागणार तेंव्हाच शाळा बंद करणार काय? जिल्हा प्रशासनाचे,महापालिकाचे अधिकार काय खुलासा करावा.

स्वाईन फ्ल्यूमुळे लोकांमध्ये घबराट निर्माण झाली ती कशामूळे होतो ती होवू नये यासाठी काय उपचार व उपाय केले पाहिजे त्या माहितीचा बोर्ड वार्ड कार्यालय,बसस्टॅण्ड व इतर गर्दीच्या ठिकाणी लावावे पॉम्प्लेट छपाई करून स्वच्छता निरीक्षक,जवान यांचेमार्फत नागरीकांपर्यत पोहचावे. विमानतळ,रेल्वेस्टेशन,बसस्टँड येथे पथक नेमावे. या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा केली होती कार्यवाही केली नाही.डॉक्टराची संख्या कमी आहे,असलेले डॉक्टर १२ तास काम करतात बाहेरील डॉक्टर घेवू शकतो I.M.I. ला बोलू शकतो का, याचा विचार करावा या आजाराची साथ आल्यास पुणे सारखी परीस्थिती निर्माण होउ शकते त्यासाठी आतापासून काळजी घ्यावी बाहेरील डॉक्टर तयार ठेवावेत.

डॉ. आशा बिनवडे :स्वाईन फ्ल्यू म्हणजे काय ,सध्या स्थिती काय तो होवू नये यासाठी प्रशासनाने काय उपाययोजना केल्या खुलासा अगोदर घ्यावा त्यानंतर चर्चा करून सुचना करता येईल.

श्रीमती मेहरून्नीसा खान :नाशिक पुणे व इतर नजीकच्या शहरात स्वाईन फ्ल्यूची साथ आली कचरा वेळेवर व दोन वेळेस उचलणे आवश्यक असून घरोघरी बकेट देणे आवश्यक आहे डॉक्टराची बैठक आयोजित करून दवाखान्यात औषधोपचाराचे नियोजन करावे आवश्यक ठिकाणी औषध फवारणी करण्यात यावी.

मा.महापौर :स्वाईन फ्ल्यू नेमका काय आहे तो कशामूळे होतो शहरातील स्वच्छतेच्या तसेच नाले सफाई बाबत तसेच शहरा डेंग्यू व मलेरिया सारखे आजार होत आहे या सर्वाच्या बाबतीत प्रशासनाने काय उपाययोजना केल्या माहिती दयावी.

आरोग्य वैद्य. अधिकारी :स्वाईन फ्ल्यू एप्रिल पासून ऐकण्यात येतो प्रथम मॅस्कीओ राज्यात झाला डुकरापासून झाला असा एक समज आहे किती प्रमाणामध्ये डुकरापासून हेल्थ ऑर्गनायझेशन म्हटले. विषाणु जरी आला असला आता डुकरावर क्लेम करता येणार नाही आता प्रसार Man To Man होतो यापूर्वी १९१८ साली त्यानंतर ३ वेळेस रिपीटेशन झाले ही ४ थी वेळ आहे.इन्फ्ल्यून -ए नावाचा व्हायरस स्ट्रेनच्या वेगवेगळया फॉम मध्ये येतो एच-१ एन-१ या नावाने ओळखला जातो. कुठलाही व्हायरस आला व्हॅक्शीन शिवाय पर्याय नाही. ट्रीटमेंन्ट तेवढी इफेक्टयू अॅव्हेलेबल नाही म्हणून व्हॅक्शीन हे सर्वात चांगले उत्तर आहे.व्हॅक्शीन एकाचे तयार केले तर पुढील वेळेस वेगळया प्रकारचा ,जीवाणूपासून येतो त्यास पुर्वीचे व्हॅक्शीन इफेक्टीव राहात नाही.थोडया दिवसानंतर एक्सपोजर आले तर ते मोठया प्रमाणात असेल तर रूग्णास रोखवतो लहान प्रमाणात असेल तर त्यातून रूग्णास इव्हीनीटी डेव्हलप होतात आपोआप याचे एक रीजीस्टेन होते व आजार कमी होतो.२-३ महिनेचा कालावधी असतो व्यक्ती जवळ आल्यावर लगेच हवेतून पसरतो जसे पुणे मुंबईत झाले त्यामुळे कंट्रोल करण्यास उशीर लागतो केंद्र,राज्य शासन यांनी हा आजार भारतात येवू नये म्हणून परदेशातील प्रत्येक नागरीकाची विमानतळावर स्क्रीनींग करायचे पॉजीटीव्ह निघाले तर योग्य ती ट्रीटमेंन्ट देवून त्यानंतर जनरल पब्लीकमध्ये जाण्याची परवानगी देवू असा निर्णय घेतला होता नासाला काही विदयार्थी गेलेमूळे आजार आला अशी चर्चा आहे येथे येईल असे ग्रहीत धरुन मा.जिल्हाधिकारी यांनी दि.८-८-२००९

मध्ये बैठक घेवून शासनाने जे निर्देश दिले ते समोर ठेवले व महापालिकेने काय करायला पाहिजे सुचना दिल्या दिं.९-८-२००९ रोजी मा.महापौर,मा.आयुक्त यांचे समवेत बैठक झाली त्या बैठकीत काही ठोस निर्णय झाले या बैठकीला आयएमआय असोशिएशन,मोठया हॉस्पीटलचे प्रमुख यांना बोलावले महापालिकेकडे आरोग्य सेवा संबधात कमतरता असल्याने मोठे हॉस्पीटल किंवा वार्ड तयार करू शकत नाही. महापालिका हॉस्पीटलची यंत्रणा ही लोकसंख्येच्या तुलनेत तोकडी आहे म्हणून एमजीएमचा एक वार्ड ॲटच करून घेण्याचे ठरवले होते परंतु शासनाने निर्देश केले की कुठल्याही खाजगी लोकांना यामध्ये सामावून घ्यायचे नाही जे काम करावे लागेल ते पूर्णपणे शासन सांभाळेल यासाठी लागणारे सर्व साहित्य शासनामार्फत जेथे गरज आहे तेथे पुरवठा केला जातो परवा मा. मुख्यमंत्री यांनी बैठक घेतली त्यात त्यांनी गरज पडल्यास खाजगी हॉस्पीटलला ॲटच करून घ्यावे.त्या ठिकाणी लागणारा औषध साठा हा शासनाकडून मिळेल एन-९ टू -५ मास्क प्रोटेक्यूव आहे असे म्हणू WH-१ ही मागणी केली आहे.परंतु त्यास व्हायरन फिल्टन वगैरे नाही.एन-९ टू -५ मास्क हा शासनाकडून पुरवठा होतो आतापर्यंत १८ मास्क व टॅमीफ्ल्युच्या २५ गोळया महापालिकेला एक किंवा दोन रोगीवर उपचार होवू शकतात एवढे साहित्य दिले रूग्णाची संख्या वाढली तर त्या प्रमाणात साहित्य मिळू शकेल महापालिकेकडे इन्फॅक्ट्रचर नसल्यामूळे आता सध्या जीएमसीचे वापरतो महापालिकेच्या ५ ही रूग्णालयात नागरीकांसाठी स्क्रीनींगची व्यवस्था केली सध्या फ्यू प्रमाण जास्त आहे सर्वच फ्यू हा स्वाईन फ्यू नाही जे बातम्या व वृत्तपत्रात येते यामूळे नागरीकांमध्ये घबराट निर्माण होते.खुपच भयानक रोग आहे असा समज होतो परंतु हा साध्या फ्यू सारखाच रोग आहे जो तो वेळेवर औषधोपचार झाले तर रोगी ताबडतोब बरा होतो. चांगले झाले रूग्णाची आकडेवारी जास्त न दाखविता मयत झालेलेचे आकडा दाखवला जातो.

श्री.सय्यद खुसरो .माझे वार्डात ४ महिण्यापासून फवारणी होत नाही मलेरिया सारखे रोगाची उत्पत्ती होते फवारणी किती दिवसानंतर होते याकडेही लक्ष दयावे. सदर कर्मचारी यांना फोगींगसाठी डिझेल वगैरे पुरेसे दिले जात नाही अशी माहिती आहे.

आरोग्य वैद्य अधिकारी :८ दिवसाला सर्वच ठिकाणी फवारणीचे काम पूर्ण होईल.

श्री.सलीम खान :डेग्यू आजार कशामूळे होते बुढीलेन मध्ये २५ वर्ष व्यक्तीचा डेग्यूमूळे मृत्यू झाला यास कोण जबाबदार आहे.स्वच्छता होत नाही औषध फवारणी ही होत नाही.

श्री.मिलींद दाभाडे : फोगींग मशीन ६ महिण्यापासून बंद आहे. वार्ड अ मध्ये बंद आहे. स्वाईन फ्यूला प्रतिबंध करण्यासाठी स्वच्छता होणे आवश्यक आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. स.सदस्य श्री.रशिद मामू यांच्या वार्डात २५ वर्षीय इसमाचा डेंगुमूळे मृत्यु झालेला आहे. डेंगु रोग कित्येक दिवसापासुन शहरात आहे, डेंगुबाबत प्रशासनाने माहिती दिली नाही. डेंग्यु होवू नये,म्हणून आपण प्रयत्न करणार नाही का. वार्ड अधिकाऱ्यांनी त्यांच्या वार्डात फवारणी बाबत पहाणी केली पाहिजे. फॉगींग मशीनचा वापर आमच्या वार्डात केला जात नाही.

मा.महापौर :शहरातील साफसफाई आणि स्वच्छतेबाबत प्रशासनाकडुन माहिती घेणार आहे. सुरवातीस स्वाईन फ्लू बाबत माहिती जाणुन घेवु त्यानंतर साफसफाई आणि स्वच्छतेबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे ते जाणुन घेवु.

श्री.मिलींद दाभाडे :वार्ड अ मधे फॉगींगच्या मशीन गेल्या सहा महिण्यापासून बंद अवस्थेत आहे. आठ दिवसांतुन एकदा फवारणी का होती सदरील एरीया हा स्लम एरीया आहे.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाने खुलासा केला की, शासनाकडुन २५ मास्क आणि २५ गोळया आलेल्या आहेत सदरील औषधे हे स्वाईन फ्लू झालेल्या रोग्यांसाठी असेल परंतु सदरील रोग होउ नये म्हणुन औषधांचा पुरवठा झालेला आहे काय? होमिओपॅथीमध्ये काही गोळ्या आहेत, असे कळते. ते का घेतले नाही. सुरवातीस फवारणी बाबत खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : आपल्याला इंटरनेटवरून लिट्रेचरमध्ये घेतल्यानंतर क्रिमोप्रोफोलाईक्सेस नावाचा एक प्रकार त्यात दिलेला आहे. क्रिमोप्रोफोलाईक्सेस गोळया दहा दिवस एक एक गोळी रोज वापरल्यास किंवा ज्यांना हया रोगाची शंका आहे अशांनी ती वापरल्यास सदरील रोगाचा त्रास होणार नाही परंतु हया गोळया बाजारात मिळत नाही हया गोळया फक्त शासनाकडुन मिळतात. अजुन पर्यंत शासनाने क्रिमोप्रोफोलाईक्सेशन घेतलेले नाही. जे तज्ञ रोज रोग्यांना ट्रिट करतात त्यांना देण्यासही क्रिमोप्रोफोलाईक्सेस गोळया उपलब्ध झालेल्या नाहीत.

श्री.हिम्मतराव दाभाडे :गोळया/औषधे मिळण्यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :टेलिव्हिजन,वर्तमानपत्राच्या माध्यमातुन गोळयांचे नांवे येत आहे, श्री.रामदेवबाबाने खुलासा केला की, गुगूळ/गुळवेद नावाचे आयुर्वेदमधील औषधाचा वापर केल्यास त्यापासुन काही हानी नाही. रोगाची लागण होवु नये म्हणुन प्रशासन काही उपाययोजना करू शकत नाही काय?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:आयुर्वेदबाबत शासनाचे निश्चित अशी गाईडलाईन दिलेली नाही.

श्री.प्रशांत देसरडा :शहरातील जे बीएचएमएस कॉलेज आहे त्यांना होमीओपॅथीक औषधांचा पुरवठा करण्यास सांगीतला पाहिजे व महानगरपालिका व बीएचएमएस कॉलेज यांची एक संयुक्त बैठक आयोजित करायला पाहिजे.

श्री.मुजीब मिर आलमशाह : स्वाईन फ्लूची तपासणी संदर्भात तीस ते चाळीस जणांची तपासणी केली त्यांचा अहवाल आला आहे काय?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : अहवाल आलेला नाही एकच संस्था तपासणी करत असल्यामुळे त्याठिकाणी सॅम्पल तपासणीसाठी गर्दी झालेली आहे. याबाबत दररोज फॉलोअप सुरू आहे.

श्री.मुजीब मिर आलमशाह : अहवाल येण्यास उशीर लागत असेलतर प्रशासनातर्फे कुठल्या उपाय योजना करत आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:सदरील रूग्णांना जास्त त्रास होत असेल तर त्यांनी सरकारी रुग्णालयात ॲडमिट करून तातडीने घाटी येथे औषध उपचार सुरू केले जातात.

श्री.भगवान घडमोडे :सध्या जनता भयभीत झालेली आहे. शहरात दररोज साफसफाई झालीच पाहिजे. या रोगासंदर्भात जनजागृती करणे महत्वाचे आहे. शासनाने जे मास्क उपलब्ध करून दिले आहे ते खाजगी दुकानांमधे १५ ते २० रूपयांना

विक्री होत आहे. सार्वजनीक, शाळा,संस्था या ठिकाणी गर्दी कमी करणेबाबत जागृती करायला पाहिजे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :सदरील रोग येण्यास शहरात वेळ लागणार नाही हा रोग होवु नये या करीता शहरात साफसफाईकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

मा.महापौर :सफाई या विषयावर वेगळी चर्चा करणार आहे सध्या स्वाईन फ्लू बाबत चर्चा चालू आहे इतर सदस्यांना याबाबत बोलावयाचे आहे.

श्रीमती डॉ.आशा बिनवडे :संपूर्ण जगामधे हि साथ आलेली आहे, देशामधे हि साथ आलेली आहे ज्या प्रमाणात चर्चा करायला पाहिजे गांभिर्याने पाहिले पाहिजे त्याप्रमाणात या रोगाकडे पाहिजे जात नाही. जागतिक आरोग्य संघटनेने यास पांडेमिक म्हणुन जाहिर केलेले आहे म्हणजे हा साथ रोग फैलावत आहे. ६० वर्षापुर्वी स्वाईन फ्लू आलेला आहे पण आत्ता एचवनएनवन हया आजाराला नव्याने समोरे जाणार आहे म्हणुन हे संकट अधिकच गंभीर आहे. वर्तमानपत्रात वाचण्यास मिळाले की सेंटरवर अधिकारी नव्हते त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली तसेच महानगरपालिकेने शाळांना सुट्टी जाहिर केली होती मात्र जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात सुट्टी रद्द केली अशा बातम्या वाचून खंत वाटली. प्रशानाने यात राजकारण न करता गांभीर्याने काम केले पाहिजे. बन्सीलालनगर सेंटरचे वैद्यकीय अधिकारी श्री.तलत काझी हे अतिशय जबाबदार मेडिकल ऑफिसर आहे त्यांनी ३० रूग्णांना घाटी येथे रेफर केलेले आहे. महानगरपालिका प्रशासन चांगले काम करत आहे. अशा वेळेस सर्व अधिकाऱ्यांना संभाळुन काम करून घेतले पाहिजे. दोन स्तरावर काम करायचे आहे महानगरपालिका म्हणुन या आजाराला कसे रोखु शकु आणि रोग झाल्यानंतर त्याची ट्रिटमेंट कशी करणार आहे. जेव्हा जागतिक स्तरावर पांडेमिक म्हणुन जाहिर होत आहे तेव्हा त्याचे गांभिर्य ओळखले पाहिजे. एकटया गर्व्हमेंट हॉस्पिटलवर अवलंबुन राहणे योग्य नाही. प्रत्येकाला मास्क उपलब्ध करुन देणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. ३० ते ४० रूग्णांचे नमुने तपासणी साठी पाठविलेले आहे त्याचा अहवाल आलेला नाही म्हणुन एकही रुग्ण पॉजिटिव्ह नाही म्हणुन चालणार नाही. सर्व खबरदारी प्रशासनाने घेतली पाहिजे. पुण्यातील ज्या दहा व्यक्ति मरण पावलेले आहे त्यांचे नातेवाईकांचे स्टेटमेंट ऐकले तर लक्षात येईल की, वेळेवर उपचार मिळाले असते तर हि स्थिती आली नसती. शहराची लोकसंख्या १२ ते १३ लाख आहे तेवढे मास्क उपलब्ध करून घ्यावे लागतील तसेच टॅमि फ्लू गोळया हया संशयीत रूग्णाला दिल्या पाहिजेत. आज जेव्हा मी खाजगी रुग्णालयास भेट दिली तेव्हा मिळालेली माहिती हि धक्कादायक आहे महानगरपालिकेने मिडीयाला सांगीतले की, खाजगी रूग्णालयांना याबाबत सुचना दिलेल्या आहेत परंतु खाजगी रुग्णालयांना याबाबत कुठल्याही गाईडलाईन दिलेल्या नाहित. खाजगी डॉक्टरांनाही कळविलेले नाही. हे सर्व जण कंन्फ्युजनमधे आहेत. त्यामुळे महानगरपालिकेकडुन तातडीने गाईडलाईन गेल्या पाहिजेत. हि बाब अतिशय गंभिर आहे. स्वाईन फ्लू हा आजार नव्याने आल्याने त्याबाबतीत वर्कशॉप आयोजित करण्यात येत आहे सदरील आजारास कशापध्दतीने ट्रिट करायचे डॉक्टरांनी कुठल्या उपाययोजना, सुचना, काळजी घ्यावयाची याबाबतीत मार्गदर्शन केले जात आहे.

महानगरपालिकेच्या पाच सेंटरवर डॉक्टर विना संरक्षण ट्रिटमेंट देत आहे. एन ९५ हा मास्क संबधीतांना उपलब्ध करून दिलाच पाहिजे तो सर्वांना उपलब्ध करून देवु शकलो नाही. दोन डॉक्टरांचे यात प्राण गेलेले आहे. महानगरपालिकेचे आरोग्य विभाग याबाबतीत गांभिर्य नाही फक्त वर्तमानपत्रात बातम्या देण्यापलिकडे काहिही केलेले नाही. खाजगी मोठमोठे हॉस्पिटल महानगरपालिकेवर नाराज आहे त्यांचे म्हणने आहे की, महापालिका जबाबदारी ढकलुन मोकळी होती, महापालिका काहीच करत नाही. जीएमसीचे ही म्हणने आहे की, महानगरपालिकेने आपली जबाबदारी पार पाडावी. सर्व गर्दीची ठिकाणे,शाळा,कॉलेज,मॉल्स यांना बंद ठेवणे आवश्यक आहे. हया आजाराचे सात दिवसाचा कालावधी असतो त्याच्यामुळे सर्वच पेशंटमधे याचे लक्षणे दिसतील असे नाही. लक्षणे न दिसणाऱ्या पेशंटमधेही हे लक्षणे दिसु शकतात. या सर्व गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणाहून प्रवासी शहरात येत आहे त्या सर्व ठिकाणी स्क्रिनिंग करणे आवश्यक आहे. ते जर केले नाही तर गंभीर आजाराला सामोरे जावे लागेल म्हणुन आवश्यक ती काळजी घ्यावी लागेल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :हा आजार डुकरापासुन होतो का? असे असेलतर शहरामध्ये ठराविक ठिकाणी वराह पालन आहे मुख्य म्हणजे गांधीनगर व इतरही भागात डुकराचे वास्तव्य असेल त्याकडे महापालिकेने लक्ष देण्याची गरज आहे. स्वाईन फ्लू आजारावर होमिओपॅथीकचा चार दिवसांच्या गोळयांचा कोर्स घेण्यात यावा. सर्वात महत्वाचा निर्णय प्रशासनाने घेतला होता तो म्हणजे शाळा बंद करण्याचा परंतु शासनाने तो रद्द केला. दिनांक १० तारखेला कॉग्रेस कार्यकारणीच्या बैठकीत मुख्यमंत्र्यानी सांगीतले की, जनतेमधे जावुन शाळा, कॉलेज, संस्था, मॉल बंद ठेवण्याचे आवाहन करा. मास्कबाबत जनतेत जनजागृती केली पाहिजे. प्रशासनास माझी विनंती आहे की, सर्वात प्रथम महानगरपालिकेच्या शाळा सात दिवस बंद ठेवण्यात याव्यात तसेच नाल्यावरील जे अतिक्रमण आहे ते काढण्यात यावे. नाला साफसफाई करून घेण्यात यावी. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करायला पाहिजे. आयुर्वेद डॉक्टर घेतले. होमीओपॅथी डॉक्टर घेण्यात यावे. सदरील रोगाला आळा बसण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. मानसिकरित्या सदरील रोगाची भिती घालविण्यासाठी जागृती निर्माण केली पाहिजे.

श्रीमती कला बोरामणीकर :समर्थनगर गुलमंडी निरालाबाजार भागात हॉटेलचा कचरा नाल्याच्या काठावर, नाल्यात टाकला जातो त्या ठिकाणी डुकरांचा मोठा सुळसुळाट दिसतो. फास्टफुड सेंटर,हॉटेल यातील सर्व ओला कचरा रात्री नाल्यांमधे टाकला जातो. नागेश्वरवाडी येथील नाल्यात शेणाचा कचरा टाकला जातो. याकडे प्रशासनाने दक्षता घेण्यात यावी डांसाची फवारणी झालेली नाही फवारणी करण्यात यावी.

श्री.संजय शिरसाठ :मा.आयुक्तांसोबत बसुन चर्चा करून सदरील प्रश्न कसा सोडवता येईल याकडे लक्ष दिले जाईल. प्रशासनाने स.सदस्या श्रीमती आशा बिनवडे यांनी ज्या सुचना केल्या आहेत त्यांची प्रशासनाने दखल घ्यावी. महानगरपालिकेचे पाचही सेंटर उत्तम प्रकारे काम करत आहे. प्रशासनाने तात्काळ जे साहित्य, गौळया औषधे लागतात त्यांचा पुरवठा संबधीत

विभागांना तात्काळ करून द्यावा. शाळा बंद करण्याचा निर्णय सर्व सदस्यांनी मिळुन घेतला होता परंतु शासनाने तो रद्द केला आहे तरी प्रशासनास विनंती करण्यात येते की, सभागृहाच्या भावना लक्षात घेता शाळा बंद ठेवण्यात याव्यात. विशेष पथक म्हणुन महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना सेंटरवर पहाणी करण्यासाठी पाठविण्यात यावे.

श्री.वसंत नरवडे :शहरात फवारणी करतांना एकाच ठिकाणी तीन कर्मचारी असतात तर हया तीन कर्मचाऱ्यांना तीन ठिकाणी फवारणी करण्याकरीत दिल्यास चांगल्याप्रकारे काम होवु शकते. शहरात जे वराहपालन करणारे लोक आहे त्यांनी महापालिकेकडे इतरत्र ठिकाणी जागा दयावी म्हणुन निवेदन दिले आहे त्यांचा विचार करावा त्यांना या गावच्या बाहेर कुठे जागा देता येईल त्या बाबतीत कार्यवाही करावी. सेंटरवर दोन वेळेमधे ओपीडी चालू ठेवण्यात यावी. रुग्णांना बसण्यासाठी शाळेमधे जे बेचेंस पडलेले आहे ते रुग्णांना बसण्यासाठी पुरविण्यात यावे.

श्री.मुजीब मिर आलमशाह : साफसफाई आणि आरोग्य बाबत चर्चा केली आहे. आरोग्य विभागामधे निधी राखुन ठेवलेला आहे काय? डॉक्टरांची कमी असल्याबाबत चर्चा झाली आहे काय? प्रशासनाने जे डॉक्टरांची संख्या कमी आहे ते पदे भरुन घ्यावी जेणे करून नागरीकांना चांगल्या सुविधा मिळतील. डॉक्टरांची भरती करून लवकरात लवकर स्वाईन फ्लूशी सामना करायला पाहिजे.

श्री.प्रशांत देसरडा :रुग्णांचे नमुणे तपासणीसाठी पुणे येथे पाठविले आहे सदरील अहवाल केव्हा येणार आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:आत्तापर्यंत ४३ सॅम्पल पाठविण्यात आले आहे परंतु एकाही सॅम्पलचा अहवाल प्राप्त झालेला नाही. २४ तासात अहवाल प्राप्त होणे अपेक्षीत आहे शासनाने नोडल ऑफिसर म्हणुन सिव्हील सर्जन यांच्या मार्फत सॅम्पल पाठविणे आवश्यक आहे व त्यांनी अहवाल प्राप्त करायचा आहे. सिव्हील सर्जनशी दररोज फॉलोअप सुरू आहे.

श्री.प्रशांत देसरडा :दोन ते तीन दिवसांमधे अहवाल येणे अपेक्षीत आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : बाहेरील रूग्ण होते. संशयीत रूग्ण होते.

मा.महापौर :प्रशासनाने कुठल्या उपाययोजना केलेल्या आहे.

श्री.प्रशांत देसरडा :एखादया व्यक्तिला स्वाईन फ्लू झाला आहे कि नाही हे कुठल्या लक्षणावरून कळते.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी: लाळच्या तपासणीच्या अहवालाला अंतिम मानले जाते.

श्री.प्रशांत देसरडा :शासनाची तसेच घाटीची जबाबदारी आहे म्हणुन चालणार नाही महानगरपालिकेचीही जबाबदारी आहे.

श्रीमती डॉ.आशा बिनवडे :१५ सॅम्पल पाच ते सहा तारखेला पुणे येथे तपासणीसाठी गेलेले आहे. आपण बघु नये, असे नाही. पुणे येथील लॅबचे म्हणने आहे की, आमच्याकडे कुठलेही रिपोर्ट पेडींग नाही.

मा.महापौर :याबाबत विसंगती आहे एनआरबी,पुणे यांचे म्हणण्याप्रमाणे एकही रिपोर्ट पेडींग नाही आपण नमूने पाठविलेले असेल. त्यावर संबधीत व्यक्तिंचा जीव अवलंबुन आहे. ज्या व्यक्तिंचे नमूने पाठविलेले आहे त्या व्यक्तिंची संपुर्ण माहिती असणे महत्वाचे आहे. ताबडतोब संबधीत लॅबशी संपर्क साधुन माहिती घेण्यात यावी. स्वाईन फ्लू बाबत सभागृहात गांर्भियाने चर्चा केली आहे सुदैवाने स्वाईन फ्लूची लागन शहराला झालेली नाही. सदरील रोग हा केव्हाही शहरात येवु शकतो त्यास नियंत्रणात आणणे गरजेचे आहे.

प्रशासनाने खाजगी प्रॅक्टिस करणारे तसेच इतर अधिकाऱ्यांना ट्रेनिंग, माहिती दिली होती काय? त्या बाबत काय कार्यवाही केली याची माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:ज्या प्रमाणे शासनाच्या सुचना येत गेल्या त्या प्रमाणे कार्यवाही करत गेलो आहे. ट्रेनिंग कुणालाही दिलेले नाही.

श्री.प्रशांत देसरडा :शासनाने सांगीतले तरच कार्यवाही करणार का महानगरपालिकेचा कायदा काय म्हणतो.

मा.महापौर :शासनाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही तर केलीच परंतु बीपीएमसी ॲक्ट नुसार शहराच्या आरोग्याची काळजी घेण्याचे जबाबदारी आपली आहे. शहरातील संघटनांची बैठक घेवुन ठरविण्यात आले होते की, प्रायव्हेट प्रॅक्टिसर्नरला ट्रेनिंग देण्यात यावी असे निर्देशित केले होते. त्याबाबतीत कुठली कार्यवाही केली माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : नउ तारखेला मा.महापौरांनी बैठक घेतली. त्यानुसार डॉक्टरांना पत्र दिले.रूग्णांचे पत्रे दिले होते. सदर पत्र आरोग्य केंद्रास वाटप करण्यासाठी आारोग्य विभागास सांगितले होते.

मा.महापौर :ट्रेनिंगसाठी दिड ते दोन तासांचा अवधी लागणार होता सदरील निर्देशाचे प्रशासनाने पालन केलेले नाही.

श्री.भगवान घडमोडे :किती डॉक्टरांना ट्रेनिंग दिलेली आहे. किती जणांना मार्गदर्शन केलेले आहे मास्क किती जणांना दिलेले आहे.

श्रीमती आशा बिनवडे :प्रशासनाकडुन खाजगी हॉस्पीटला पत्र गेलेले आहे की, संशयीत रूग्णास घाटी येथे तपासणीसाठी पाठविण्यात यावे या पलिकडे कुठल्याही गाईडलाईन देण्यात आलेल्या नाहीत.

मा.महापौर :खाजगी रुग्णालय,खाजगी डॉक्टरांना ताबडतोब गाईड लाईन देण्यात याव्यात तसेच महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी कर्मचारी जे रुग्णांची तपासणी करतात त्यांच्या सुरक्षीतते करीता प्रशासनाने कुठल्या उपाययोजना केलेल्या आहे माहिती देण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा :१५ ऑगष्ट येत आहे त्यामुळे शाळांनाही गाईड लाईन देण्यात याव्यात.

मा.महापौर : याबाबतीत सिनिअर मेडिकल ऑफिसर यांना गाईड लाईन दिलेल्या आहेत. एनआरबीच्या संपर्कात सतत आम्ही आहे आज सायंकाळी ४ वाजता त्यासंबधी बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. अनेक सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे नागरीकांमधे जनजागृती करणे आवश्यक आहे ती प्रशासनाने करावी. जे अधिकारी कर्मचारी पाच केंद्रावर काम करीत आहे त्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने एन ९५ मास्क तसेच टॅमिफ्लू गोळयांचा ताबडतोब पुरवठा करण्यात यावा तसेच त्यांना जे आवश्यक साधन सामुग्री सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची आहे ते पुरविण्यात यावे. तसेच काही सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक औषधे जे घेतल्याने नुकसान होत नाही तर प्रशासनाने आपल्या हॉस्पीटलमधे तशा प्रकारच्या सुचना देण्यात याव्यात. खाजगी प्रॅक्टिशनर्सना गाईड लाईन दिल्या पाहिजेत वर्कशॉप घेतले पाहिजे. बीपीएमसी ॲक्टनुसार कार्यवाही करण्याचे अधिकार आहे त्यानुसार कार्यवाही करावी. शहराची काळजी असल्यामुळे सभागृहाने शाळा बंद करण्याचे निर्देश दिले होते प्रशासनाने सभागृहाची भावना जिल्हाधिकारी यांना कळविण्यांत यावी. स्वाईन फ्लू पसरु नये म्हणुन निर्णय घेतलेला होता. स.सदस्यांनी

सांगीतल्या प्रमाणे अत्यावश्यक रक्कम बजेटमधे समाविष्ठ करून घ्यावी. मा.आयुक्तांना विनंती आहे की, शहरात मास्क पुरविण्याची व्यवस्था करावी. स्वाईन फ्लू बाबत आवश्यक त्या उपाययोजना प्रशासनाने कराव्यात. सर्व सदस्यांच्या मते शहरात साफसफाई व्यवस्थितरित्या होत नाही तसेच फवारणीही शहरात कुठे होत नाही याबाबत प्रशासनाने योग्य ती पावले तातडीने उचलावीत.

मा.आयुक्त :स्वाईन फ्लू आणि साफसफाईबाबत बऱ्याच वेळापासून चर्चा चालू आहे. सदरील रोगाचे देशात राज्यात आणि शहरात संशयित म्हणून पाहीले जाते. यासाठी जे काही उपाययोजना करण्यात आले त्या संबधी माहिती आणि साफसफाई संदर्भात करण्यात आलेली उपाययोजना संदर्भात निवेदन करू इश्चितो. तीन बैठका अधिकाऱ्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या आणि डॉक्टरांच्या घेण्यात आलेल्या आहेत. ८,१०,१२ तारखेला बैठक घेण्यात आलेल्या आहेत. १० तारखेच्या बैठकीमधे मेडीकल कॉलेजचे डिन, आयएमएचचे पदाधिकारी, पिडॅट्रिक असोसिएशनचे पदाधिकारी त्याच प्रमाणे इतरही महानगरपालिकेचे पदाधिकारी आणि अधिकारी हे उपस्थित होते. त्यानंतर लगेचच वार्ड अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली व सुचना देण्यात आली होती. धडक कृती दल स्थापन केलेली आहे त्यामधे अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. दहा तारखेच्या बैठकीत ठरले होते की, दोन दिवसांमधे संपुर्ण शहराची स्वच्छता करण्यता यावी यासाठी जी माहिती घेतली त्यात जे फंड हवे असतील किंवा जी सिस्टीम उभी केली ती तसेच जे हवे असेल ते सांगावे व ४८ तासांच्या आत स्वच्छता करण्यात यावी साठलेला कचरा असता कामा नये. संपुर्ण शहराची फवारणी,फॉगींग चे काम तातडीने करण्यात यावे असे आदेशीत करण्यात आले होते. फॉगींगसाठी दोन ट्रॅक्टर वापरण्यात येवुन नाल्यावर आणि शहरात फवारणी करण्यात यावी. फवारणी करणाऱ्या कर्मचारी यांना सत्तर मॅन्युएल मशीन उपलब्ध करून दिलेल्या आहेत. एक कर्मचारी दिवसभरात एक वार्ड करतील. ०२ दिवसात फवारणी पूर्ण करावी. असे आदेश दिलेले आहे.ज्या ठिकाणी मोकळया जागा,नदी नाले आहेत अशा ठिकाणी दोन ट्रॅक्टरच्या साहयाने मशीन बसवुन फवारणी केली जाईल. अशा प्रकारचे आदेश देण्यात आले होते. यांच्यावर नियंत्रणासाठी सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. प्रत्येक वार्डासाठी सहा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या त्यात, मुलेप श्री.विलास जाधव,उपआयुक्त(सिडको)श्री.जावळीकर,क.नि.व संकलक श्री.अजय चारठाणकर,श्री.कांबळे उपआयुक्त(प्र),श्री.घुगे उपआयुक्त (म), शहर अभियंता यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. ११,१२,१३ या तिन दिवसांमधे संबधीत वार्डनिहाय अधिकाऱ्यांनी दोन वेळेस भेट देवुन साफसफाईचा फॉलोअप घ्यावा व दिवसातुन दोन वेळेस अहवाल देण्याचे आदेशीत केले होते. काल पासुन रिपोर्ट सुरू झालेले आहेत. जेथे झाले नाही त्यांचेवर कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे. याचप्रमाणे शहरातील नागरीकांना सोईस्कर व्हावे म्हणुन मुख्यालयात ०६ कर्मचारी श्री.अभंग यांच्या नेतृत्वाखाली २४ तास कंट्रोल रूम सुरू केले. कंट्रोल रूमद्वारे ५९ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सर्व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहे. पाच केंद्रामधुन स्क्रिनिंगची

सुविधा देण्यात आलेली आहे. दिनांक १२.०८.२००९ पर्यंत जवळपास २१०० रूग्णांचे स्क्रिनिंग झालेले आहे. १६८ संशयीत रूग्ण म्हणुन घाटी येथे पाठविण्यात आलेले आहे. त्यापैकी ४३ सॅम्पल तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. अहवाल अद्यापपर्यंत आलेले नाही, एनआरबी पुणे येथे संपर्क साधुन अहवाल येण्यास का उशीर झाला याबाबतची माहिती घेण्यात येईल. एन ९५ मास्क तसेच टॅमि फ्लूच्या रूग्णास १० गोळया द्याव्या लागतात त्याची किंमत ३००० रूपये आहे. कालपर्यंत २८०० गोळया उपलब्ध झाल्या आहे. शासनाकडे गोळयांची मागणी करण्यात आलेली आहे. २५०० मास्क पुरविण्याचे आदेशीत केलेले आहे. दवाखान्यात मोठ्या प्रमाणात मास्क पुरविण्याचे आदेश आरोग्य विभागाला देण्यात आलेले आहेत. प्रसिध्दी आणि पब्लीसिटीच्या संदर्भात २५००० पॉम्पलेट छापण्यात आलेले आहे. ५० होर्डीग्ज शहरात लावण्यात आलेले आहेत. गर्दिच्या ठिकाण वार्ड अधिकाऱ्यांनी बघुन होर्डीग्ज लावण्यात यावेत. ८ बाय १२ चे जवळपास २० होर्डीग्ज आहेत. जिल्हाधिकारी यांनी ४ वाजता बैठक बोलावली आहे मा.महापौरांनाही बैठकीस उपस्थित राहण्याची विनंती केलेली आहे. शाळा बंद करण्याच्या निर्णयाबाबत आजच्या बैठकीत निर्णय होणे अपेक्षीत आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनामधे माझाही त्यात समावेश आहे तसेच इतर अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. अजून बरेच काम करायचे आहे महानगरपालिकेने काहीच काम केले नाही हे योग्य नाही. स्वाईन फ्लू संदर्भात २४.०६.२००९ रोजी आरोग्य सेवा संचनालय यांचे पत्र प्राप्त झालेले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखाली आपत्ती व्यवस्थापन गटाची स्थापना केली आहे त्याचे सचिव सिव्हील सर्जन आहे इतर अधिकारी हे सदस्य आहेत. जसे नागरीकांमधे घबराहट आहे तशीच डॉक्टरांमधेही आहे म्हणुन डॉक्टर आणि त्यांचा स्टाफ त्यांना प्रशिक्षीत करणे महत्वाचे आहे. शासनाने जो कार्यक्रम दिला आहे त्यानुसार १५ ऑगष्ट पर्यंत प्रशिक्षण पुर्ण करावे अशा सुचना दिल्या आहेत. महानगरपालिकेमार्फत जी कार्यवाही होते त्यात प्रशासन पुढे आहे. काम मोठे आहे प्रामाणिकपणे काम महानगरपालिका करत आहे. ज्या त्रुटी आहे त्याचा मुकाबला निश्चितपणे युध्दपातळीवर केला जाईल.

श्री.संजय जोशी :४.३० वाजता बैठकीस जाणे महत्वाचे असल्यामुळे बैठक तहकूब करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :विषय क्रमांक ५५४ महत्वाचा विषय आहे त्यावर आमचा अभ्यास झाला नाही त्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे :मागील बैठकीत आरसीएच भरतीबाबत आदेश केले होते त्यांची अंमलबजावणी झाली आहे काय?

मा.महापौर :पुढची सुचना येईपर्यत सभा तहकूब करण्यात येते. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीसाठी उपस्थित राहणे गरजे आहे त्या करीता सभा तहकूब करण्यात येते.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद